माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये प्राप्त झालेले द्वितीय अपील

**अपील क्रमांक : ७९३/२०२२**

**अपिलार्थी** – श्री. प्रकाश सोमाजी नाकतोडे

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय निरीक्षक,**
**नगर परिषद, पवनी, ता. पवनी, जि. भंडारा**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, पवनी, ता. पवनी, जि. भंडारा**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०६.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.१२.२०२१ | १३.१२.२०२१ | २९.१२.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.०१.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी, "सार्वजनिक प्राधिकरणाने स्वत: होऊन प्रकाशित करावयाची कलम ४ (१) १७ मुद्द्यांची माहिती मिळणेबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, "सार्वजनिक प्राधिकरणाने स्वत: होऊन प्रकाशित करावयाची कलम ४ (१) १७ मुद्द्यांची माहिती देण्यात येत आहे", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. २९.१२.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती अप्राप्त" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केला. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)नुसार आयोगाकडे **दि. १७.०३.२०२२** रोजी "माहिती अप्राप्त" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केला आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. १७.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. ११.०६.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, पवनी, ता. पवनी, जि. भंडारा, श्री. आरिफ शेख ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद, पवनी, ता. पवनी, जि. भंडारा, श्री. विवेक मेश्राम ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. प्रकाश सोमाजी नाकतोडे यांनी दि. ०१.१२.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार नगर परिषद, पवनी येथे सार्वजनिक प्राधिकरणाने स्वत: होऊन प्रकाशित करावयाची कलम ४ (१) १७ मुद्द्यांची माहिती मागितली आहे. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्र. कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, पवनी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध असलेली १७ मुद्द्यांची माहिती प्रदान केली असून वरील सर्व माहिती ही www.paunimahaulb.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करण्यात येते. कलम ४ (१) च्या तरतुदीची कसोशीने अंमलबजावणी करण्यात येत असल्याबाबत अपिलकर्ता यांना सूचित केले असून नगर परिषद, पवनी यांचे अधिकृत संकेतस्थळ, अधिकृत ईमेल, अधिकृत फोन क्रमांक इत्यादीबाबतची सर्व माहिती देखील अपिलार्थी यांना दिली असल्याचे आढळून येते. यावर श्री. नाकतोडे यांनी माहिती अप्राप्त असल्याचा आक्षेप नोंदवित प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर दि. २५.०१.२०२२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली व दि. ३१.०१.२०२२ रोजी अपील आदेश पारित केलेला असून जन माहिती अधिकारी स्तरावरच सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे यात सुस्पष्टपणे नमूद केलेले आहे. सादर केलेले जोडपत्र अ, त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेला आदेश इत्यादींचे अवलोकन केले असता, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांना अपेक्षित असणारी माहिती ही याआधीच जन माहिती अधिकारी स्तरावरच प्राप्त झालेली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, दाखल केलेला द्वितीय अपील अर्ज हा तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

**प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.०६.२०२४**

5 SEP 2024

जावक क्रमांक ---------------६६२२---------------दिनांक ---------------------------